REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्व चळवळीत श्री कालीचरण नंदागवळी यांचे योगदान

प्रा.डॉ. प्रमोद मनोहर बोधाने
इतिहास विभाग प्रमुख , महिला महाविद्यालय, गडचिरोली.

श्री कालीचरण नंदागवळी यांचा जन्म इ. स. 1883 साली भंडारा येथे झाला. त्यांनी इ. स. 1902–1950 या कालखंडात अस्पृश्योध्दाराच कार्य केले. अनेक महार कार्यकर्त्यांनी अस्पृष्यांच्या चळवळीची सुत्रे हाती घेवून आपआपल्या कुवतीप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले. विदर्भात अस्पृश्य वर्गात आत्मोन्नतीची जाणीव निर्माण करण्यास दलित कार्यकर्त्यांनी आयुष्य वेचले आहे. असेच एक दलित कार्यकर्ते म्हणजे श्री कालीचरण नंदागवळी होय.

त्यांच्या जिवनावर प्रकाश टाकला तर असे दिसते की, समाजाप्रती संपुर्ण आयष्य वेचनाणाऱ्या या कार्यकर्त्यापैकी काहींनी लेखणाद्वारे आपले कार्य मागे ठेवले आहे. परंतु असंख्य कार्यकर्ते निव्वळ झिजत राहीले. अशाच अनेक कार्यकर्त्यापैकी श्री कालीचरण नंदागवळी हे एक होते.

श्री कालीचरण नंदागवळी यांच्या संपुर्ण जिवनाचा आढावा घेतला तर समाजाची चिंता वाहणाऱ्या, स्वतः तन–मन–धनाने राबणाऱ्या आणि निःस्वार्थी व त्यागी अशा सत्पुरूषाची प्रतिमा आपल्यासमोर उभी राहते. त्यांच्या कार्यांचे मुल्यमापण करून त्यांचे सामाजिक चळवळीच्या इतिहासातील स्थान कसे होते. हे आपल्याला माहीत करता येते.

भारतीय इतिहासात दोन महात्मे परिचित आहे. मात्र दलित वर्गाला परिचित असलेले तिसरे महात्मे म्हणजे श्री कालीचरण नंदागवळी होत. विदर्भातील दलित समाजाने आदराने व त्यांचे लोकसेवेचे निःस्वार्थ आजिवन चालविलेले कार्य लक्षात घेवूनच त्यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली होती. त्यानंतर ते समाजात महात्म नंदागवळी म्हणूनच ओळखले जावू लागले. यावरून त्यांच्या कार्याची महती कळते.

तत्कालीन कालखंडात दलित समाजाला कसल्याही प्रकारचे सामाजिक हक्क उपभोगता येत नव्हते. हा समाज अस्पृश्य मानल्या जाईल. त्यांना प्रत्येक क्षेत्रात बंदी घातल्या गेली. त्यामुळे या समाजाची सर्वच प्रकारे दारून अवस्था होती. माणूसकीच्या जीवनापासून तो वंचीत करण्यात आला. अशा काळात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, वि.रा. शिंदे यांनी केलेल्या कार्यामुळे शिक्षण घेवून आपली उन्नती करून घेण्याची तिव्रता दलित समाजात निर्माण झाली. त्यातूनच पुढे श्री विठोबा रावजी मुनपांडे, श्री किसन फागूजी बनसोडे, श्री गणेश अक्काजी गवई, श्री कालीचरण नंदागवळी आदी लोकांची एक फळी निर्माण होऊन त्यांनी 'महार सभा' नावाची संस्था स्थापन करून महार समाजात शिक्षण प्रसााराचे व सामाजिक सुधारणेचे कार्य सुरू केले.



श्री कालीचरण नंदागवळी गोंदीया तालुक्यातील एका

गावाचे मालगुजार होते. तसेच गोंदीया म्युनीसीपालीटीचे सदस्य देखील होते. त्यांना दलित समाजाच्या उन्नतीची प्रचंड तळमळ होती. आणि त्याच तळमळीतून त्यांनी इ.स.1911—12 मध्ये स्वतःच्या खर्चाने गोंदीया येथे पहिली मुलींची शाळा काढली. दलित वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'विटाळ विध्वंसक ' हे वृत्तपत्र श्री किसन फागूजी बनसोड यांच्या साथीने काही काळ चालविले. तसेच श्री किसन फागूजी बनसोड यांनी काढलेल्या 'चोखामेळा' हे वृत्तपत्र देखिल त्यांनी चालविण्यास सहकार्य केले.

मॉटेंग्यू, चेम्सफोर्ड सुधारणेनंतर दलित वर्गांना कौन्सिल मध्ये प्रतिनिधीत्व मिळाले असता ग.आ. गवई व श्री कालीचरण नंदागवळी यांची नियुक्ती झाली. श्री कालीचरण नंदागवळी हे इ.स. 1923 पर्यंतच म्हणजे 3 वर्ष एम.एल.सी. राहीले. या तीन वर्षाच्या कारकीर्दीत त्यांनी दलित वर्गाच्या शिक्षणाच्या बाबतीत, वस्तीगृहांना सरकारी अनुदान मिळण्याबाबत, सार्वजनिक विहीरी, धर्मशाळा, सरकारी नौकरीत दलित वर्गीयांचा प्रवेश यासंबंधी अत्यंत कसोशिने प्रयत्न केले.

श्री कालीचरण नंदागवळी यांचा पिंडच समाज सेवेचा होता. त्यांनी दलित वर्गाच्या सुधारणेचे व त्यांच्यात अन्यायाविरूध्द जागृती निर्माण करण्याचे कार्य अविरतपणे केले. महार समाजात विटाळाची भावना फार मोठया प्रमाणात होती. ती दूर करून सामाजिक सुधारणा घडवून आणण्याकरीता श्री कालीचरण नंदागवळी यांनी पत्रके काढून तसा प्रयत्न केला.

इ.स. 1920 साली नागपूरला झालेल्या भारतीय बहिष्कृत परिषदेचे श्री कालीचरण नंदागवळी हे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेला कोल्हापूरचे शाहू महराज अध्यक्ष म्हणून होते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रथमच या परिषदेला उपस्थित होते. ही परिषद प्रामुख्याने अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्कांच्या मागणी संबंधीच्या पार्श्वभुमीवर घेण्यात आली होती. श्री कालीचरण नंदागवळी हे एक उज्वल, त्यागी, लोकसेवारत असलेले व्यक्तीमत्व होते. राजकारण आणि समाजकार्य करणाऱ्या पुढाऱ्यात त्यांची नैतिक पातळी उच्चतम होती. यात काहीही शंका नाही.

श्री कालीचरण नंदागवळी यांनी समग्र अस्पृश्य समाजात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय जागृतीसाठी अमुल्य योगदान दिले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे दलित चळवळीला एक नवे आत्मभान प्राप्त होऊन दलित समाजात जागृतीची एक लाट पुढील काळात आल्याचे त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते.

## संदर्भ ग्रंथ :—

1) शेंडे. ना. रा. —दलितोधारक गुरूवर्य बन्सोड, श्रीशेष प्रकाशन, भंडारा, 1981
2) मून वसंत —मध्यप्रांत व वऱ्हाडातील डॉ. आंबेडकर पुर्व दलित चळवळ, सुगावा प्रकाशन पुणे, 1987
3) कोसारे एच एल. — विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, ज्ञान प्रदिप प्रकाशन, नागपूर, 1984